# प्रभुतरुण

| वर्ष ५३/५४ अंक १२/१ | मुंबई | १६ जुलै-१६ऑगस्ट, २०२० | पाने ६ | किंमत रु. १ |
| --- | --- | --- | --- | --- |

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


**www.prabhutarun.org**



*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर**

*कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## जय हरी विठ्ठल

**—सुहासिनी कीर्तिकर**

सध्या समाजात अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. आर्थिक विवंचना, शिक्षण समस्या, कुटुंब-व्यवस्थेला जाणारे तडे, जागतिक स्तरावरील घडामोडी, निसर्गकोप, विज्ञान-ज्ञान संकल्पनांमध्ये येणारे विदाभान आणि त्यातून होणारी गती-प्रगतीची घडामोड, सोय आणि गैरसोय यातील पुसटती, निसटती रेषा... अशा अनेक बाबींचा (सर्व वयाच्या माणसांच्या) मनावरील ताण.. मग त्यातून उद्‌भवणारे नवनवीन आजार, विकार... अशा परिस्थितीत तत्त्वज्ञ, विचारवंतच नव्हेत; तर शास्त्रज्ञ, मानसतज्ञही आज वारकरी संप्रदायातील शिकवणुकीचा, संस्कारांचा उपचार म्हणून सप्रयोग विचार करीत आहेत. परवाच जर्मनीमध्ये एका शास्त्रज्ञांच्या शिबीरात ॐकार साधनेचे, नामस्मरणाचे आरोग्यवर्धक स्वरूप सप्रयोग सादर झाले. नामस्मरण कसले ? तर 'रामकृष्णहरी'! त्यांच्या मते या दोन दोन शब्दांच्या (राम, कृष्ण, हरी) तीन उच्चारात शरीरातील मज्जातंतूंना लहरी /स्पंदनलहरी प्राप्त होतात. ज्या चेतासंस्थेला तल्लख ठेवून शरीराला आरोग्यमय ऊर्जा देतात.

'रामकृष्णहरी' हा वारकऱ्यांचा जपमंत्र आहे. या मंत्राने भारलेले कोट्यावधी वारकरी दर आषाढी कार्तिकीला चंद्रभागेच्या (भीमेच्या) वाळवंटात जमा होतात. 'काथ्याची लंगोटी। हाती वीणेची हाटी। नामा नाचे वाळवंटी।' अशी नामदेवांची उन्नत अवस्था वारकरी श्रद्धेच्या बळावर अनुभवतात. भक्तिसंप्रदायातील ही सर्वात मोठी पारमार्थिक लोकशाही आहे. प्रपंचाचा, इहलोकातील प्राप्त कर्मांचा त्याग न करता साधला जाणारा हा परमार्थ सामान्य माणसाला सर्वात सोपा असा मुक्तीमार्ग दाखवतो. हे या वारकरी संप्रदायाचे सर्वात मोठे बळ आहे. स्वत: सिद्ध असणाऱ्या ज्ञानदेवांनी स्वत:चे वेगळेपण तेव्हाच्या तथाकथित धर्मधुरीणांसमोर सिद्ध केले. त्यासाठी धडपड करताना त्यांना आणि त्यांच्या भावंडांना वणवण करावी लागली. या त्यांच्या भ्रमंतीत त्यांनी सर्वसामान्य जीवन जगणारा माणूस फार जवळून पाहिला. धर्माचे कर्मकांड आणि त्याचा निरर्थक ठरणारा जाच सहन केला. निवृत्तीनाथांकडून आणि गहिनीनाथांकडून दीक्षा घेतल्यावर आत्मज्ञान आणि अध्यात्म यांची सामान्य जनांसाठी अतिशय सोपी, सरळ सांगड घातली. ती म्हणजे नाम उच्चारणाची. नामदेवांनी म्हटलेय त्याप्रमाणे 'लपलासि तरी नाम कुठे नेसी। आम्ही अहर्निशी नाम जपू।' असे रोजच्या जगण्यातले सोपे अध्यात्म ज्ञानदेवांनी सर्व जाती-धर्मातील लोकांसाठी खुले केले. मध्ययुगीन वाङ्‌मयात इ.स.१०५० ते इ.स.१८२० हा कालखंड महत्त्वाचा ठरला तो ज्ञानेश्वरांनी केलेल्या या आध्यात्मिक क्रांतीमुळे. त्यांनी वेदप्रामाण्य सांगितले, तेही मराठीत. सामान्यजनांच्या भाषेत. भक्तीचा सर्वसामान्य माणसासाठी अतिशय सोप्पा मार्ग खुला केला. म्हणूनच कवी 'बी' म्हणतात, 'त्या बड्या बंडवाल्यात ज्ञानेश्वर मानें पहिला', हे बंड एवढे सहज की, सहजपणे नाना जातीपातींची, अठरापगड व्यवसायातील सामान्य माणसे संसार करता करता, कर्म करता करता यात सामील झाली. ठळकपणे येणारी संतांची नावे पाहिली तरी हे चटकन लक्षात येते. ज्ञानेश्वर आणि त्यांची भावंडे समाजाच्या प्रचलित धर्मकल्पनांनी त्रस्त अशी ब्राह्मण-मंडळी, एकनाथही ब्राह्मण. पण याच संतांच्या मांदियाळीत गोरा कुंभार आहे, सावता माळी आहे, नरहरी सोनार आहे, भानुदास आहे, परीसा भागवत आहे, विसोबा खेचर आहे, तुकाराम वैश्यवाणी आहे, सेना न्हावी आहे, जनाबाई दासी आहे, कान्होपात्रा आहे. इतकेच नव्हे तर चोखामेळा महार आहे. चोखामेळाच्या संदर्भात तर आणखी नवल. त्याची बायको चोखियाची महारी, मुलगा बंका महार, इतकेच नव्हे तर चोख्याचा जावईही. विविध जातीपातीची, विविध व्यवसायाची, समाजाच्या विविध स्तरातील माणसे वारकरी संप्रदायामुळे संतपदाला पोहचली. केवळ ब्रम्हज्ञ असणाऱ्या ब्राह्मण जातिवर्गापुरताच हा संप्रदाय सीमित राहिला नाही. जातिवर्गभावना वारकरी संप्रदायामुळे लोप पावली. भक्तीचा महापूर आला आणि जातीजातीतील श्रेष्ठकनिष्ठ भावना लोप पावली.

यामुळे आणखीही फार मोठे नवल भाषिक स्तरावर घडले. उच्चजातीलाच वेदशास्त्रसंपन्न तोवर होता येत असे. पण या संप्रदायामुळे, 'वेदांचा तो अर्थ आम्हासीच ठावा' असे ठामपणे तुकाराम महाराज म्हणाले. त्याचबरोबर त्या त्या जातीचे शब्दभंडार मराठी संतवाङ्‌मयात ओतले गेले. त्या त्या व्यवसायाच्या भाषेतील रूपके, प्रतिमारूपे, दृष्टान्त येत गेले. त्यामुळे वारकरी संप्रदायामुळे मराठी भाषाही सघन, समृद्ध, सुंदर झाली. 'फोडिले भांडार, आम्ही तो केवळ भारवाही' असे व्यवसायाने वाणी असणाऱ्या तुकाराम महाराजांनी म्हटले. सावता माळ्याने भक्तीचा मळा शिंपला. 'डोईचा पदर आला खांद्यावरी' म्हणत जनाबाई, दळिता कांडिता भजन गाऊ लागली. एकनाथांनी या सर्वसामान्यांसाठी भारूड, गौळण अशा रचना केल्या. 'भक्तीचा ओळंबा लावुनि विठ्ठल पहावा' असे गवंडीच म्हणू शकतो ना? 'मी महार, महार' म्हणत 'जोहार मायबाप' इतर कोण घालणार? या रीतीने मराठी भाषा काव्यसुंदर झाली. भक्तीचा मळा फुलताना विठ्ठल असा महासमन्वयक झाला. तो भक्तांसवे जेवतो, जनाबाईचे दळण दळतो, एकनाथांच्या घरी पाणी भरतो, दामाजीसाठी महार होतो, गोरोबांसाठी चिखल तुडवतो, मूळात पुंडलिकासाठी विटेवरच उभा ठाकतो! अगदी अठ्ठावीस युगे!!

ही अठ्ठावीस युगे कुठून आली? 'युगे अठ्ठावीस विटेवरी उभा।' असे आरतीतील उल्लेख सर्वसामान्यांच्या परिचयाचे आहेत. डॉ.अरविंद नेरकर यांनी याचा माग घेतला आहे.

ज्ञानेश्वरांच्या अभंगात एके ठिकाणी उल्लेख येतो,

'चहू वेदी जाग साहि शास्त्री कारण।'
अठराही पुराणे हरिसी गाता।।

चार वेद, सहा शास्त्रे, अठरा पुराणे मिळून संख्या अठ्ठावीस होते. ती ही अठ्ठावीस युगे!!

एका विटेवर समचरण रूपात दोन हात कटिवर ठेवून अठ्ठावीस युगे विठ्ठल भक्तांसाठी उभा आहे. विठ्ठलाचे कटिवर हात ठेवून उभे असणारे रूपही खासच. कारण विठ्ठलाचे भक्त विठ्ठलाकडे काहीही मागत नाहीत. विठोबाही त्यांना वरदहस्त दाखवून काही देत नाही. जे मिळवायचे आहे ते वारकऱ्याने स्वत: नामस्मरणात तल्लीन होऊन. म्हणूनच इतर देवदेवतांना साकडे घातले जाते, नवस बोलले जातात. पण विठ्ठलाकडे फक्त नामसंकीर्तनातून समर्पण भावना असते. म्हणूनच वारकरी दुरून विठोबाच्या देवळाच्या कळसाचे दर्शन घेऊनही वारी केल्याचे समाधान मिळवू शकतात. चंद्रभागेत स्नान, कस्तुरीचा टिळा लावून भजनी दंग होऊन भक्तीचा पूर मनी दाटला की, 'भेदाभेद भ्रम अमंगळ।' याची खात्री पटत आत्मोन्नती सहजधर्म म्हणून होते. कर्मकांडविरहीत ज्ञान हा वारकरी संप्रदायाचा अंगीभूत विशेषच आहे.

अशी ही विठ्ठलाची धारणा महाराष्ट्रात झाल्यावर आजवर हजारो भक्तभाविकांची दाटी चंद्रभागेच्या वाळवंटी आषाढी-कार्तिकीला झाली. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांसह साध्या वारकरी कुटुंबाला विठ्ठलपूजेचा मान मिळत आला. भाविकांची वारी, तुकाराम ज्ञानोबांच्या पादुकांच्या पालख्या निघाल्या. रिंगण धरले गेले. यावर्षी मात्र दो हात कटिवरी ठेवलेल्या विठ्ठलाला हे वारकरी वाळवंटी भेटणार नाहीत. पादुका गेल्या त्या सजलेल्या बसमधून. वारकरी घरीच राहून 'जय हरी विठ्ठल' म्हणत राहिले. विठ्ठल दर्शनाचा हा त्यांना घडलेला उपास करोनाच्या संपण्यासह पुढील वर्षी सुटावा. परब्रह्म असलेला विठूराया एवढे तर करीलच करील. तोपर्यंत 'जय हरी विठ्ठल' म्हणत सुख रूप पाहूया; राहूया!

# वादळ अस्वस्थेचे

-प्रणिता प्रभाकर

आयुष्य म्हटले म्हणजे नेहमीच खाचखळग्यांनी भरलेले असते. कोणी कधी ऐकले आहे का की, अमुकतमुकचे आयुष्य सरळसोट होते म्हणून! किंबहुना तुम्ही स्वत:चेच आयुष्य चाचपडून पाहू शकता! हिवाळा, उन्हाळा, पावसाळा हे तिन्ही ऋतू माणसाने पाहिलेले असताना हे अनुभवलेले असते. परंतु असा एक ऋतू प्रत्येकाच्या आयुष्यात येत असतो आणि त्याला झेलणे किंवा सामोरे जाणे एक महत कठीण काम असते.अशा कठीण प्रसंगाला मुद्दामच 'ऋतू' म्हटले आहे, कारण तो कायम स्वरूपी नसतो.

आज सन २०१९ मध्ये असाच एका कोविड-१९ (Carona Virus Disease-19) ह्या रोगाचा प्रथम चीनमध्ये प्रसार झाला आणि हळूहळू संपूर्ण जगाला त्याने विळखा घातला. इतका घट्ट विळखा होता की, त्या विळख्यामुळे सारे जगच स्तब्ध झाले, जणू काही जगरहाटीच लयाला गेली! एका फटक्यात करोनाने अनेकांना राम म्हणायला लावले; तर काहींना ग्रासले पण त्यातून ते बरेही झाले. दिवसेंदिवस एका बाजूला मृतांच्या आकड्यांची पोटली फुगत जात होती, तर दुसरीकडे करोनाचा प्रादुर्भाव वाढतच चालला होता. त्यामुळे संपूर्ण जग कोविडमय झाले. सगळीकडे एकच हलकल्लोळ माजला की, ह्यावर उपाय काय? ह्यांच्यापासून आपण कशी सुटका करावयाची? सगळीकडे वैद्यकीय यंत्रणा अखंड कार्यरत होती; परंतु तिचेही हात आता थिटे पडावयास लागले. जणू काही १९१८ साली जशी महामारी आली होती तशीच जवळजवळ १०० वर्षांनी पुनरुत्थित झाली.

ह्या १०० वर्षांच्या कालावधीत अनेक सुधारणा झाल्या, उपचार पद्धतीत फरक पडला, थोडक्यात संपूर्ण जीवनशैलीच यंत्रवत झाली. 'झट मंगनी पट ब्याह' सारखी परिस्थिती निर्माण झाली. एका हाकेच्या नव्हे तर एका बटणाच्या अंतरावर सर्व काही उपलब्ध होऊ लागले. त्यामुळे माणसाला जणू काही आभाळ ठेंगणे वाटावयास लागले. आपण सहजपणे निसर्गावर मात करू शकतो किंवा त्यावर ताबा मिळवू शकतो असा गोड गैरसमज निर्माण झाला आणि निसर्गाने येनकेन प्रकारेण वाकुल्या दाखवल्या. त्या वाकुल्यांची लांबी-रुंदी याचे प्रमाण माणसाच्या बुद्धीच्या आणि क्षमतेच्या बाहेरचे झाले. परिणामी माणसाला आपल्या नेहमीच्या माकडउड्या सोडून स्वत:ला घरात बंद करून बसावे लागले. ह्याचा परिणाम व्हावयाचा तोच झाला. ज्यांचे हातावर पोट होते, ते व्यवसाय, उद्योगधंदे बंद झाल्याने हातावर हात धरून बसले व पर्यायाने त्यांना गावची वाट धरावी लागली. परंतु जगजीवनच ठप्प झाल्याने त्यांना आपल्या कुटुंबकबिल्यानिशी पायी मजल दरमजल करीत गाव गाठावे लागले. दुकाने बंद, वाहतुकीची साधने उपलब्ध नसल्याने त्यांच्या जीवात जीव असेपर्यंत चालत राहाणे आणि गाठी चुरमुरे असेपर्यंत खाणे एव्हढेच ते करू शकत होते. 'खायला कोंडा नी निजेला धोंडा' ही म्हण तंतोतंत ह्या स्थलांतरीत मजुरांच्या बाबतीत लागू पडली. परंतु नियतीने आपले काम चालूच ठेवले व त्यात ह्या कित्येक मजुरांचा मृत्यू झाला. काहींचा अन्नान्न दशेने मृत्यू ओढवला. ह्या घटना घडल्या नंतर आपल्या सरकारला उपरती झाली की, टाळेबंदी तातडीने जारी करून अमलात आणण्यापूर्वी प्रत्येक राज्यसरकाराशी चर्चा करून जनतेस थोडा अवधी द्यावयास हवा होता; जेणे करून नागरिकांना त्यांच्या कामकाजासंबंधी नव्हे तर गुजराण/उदरनिर्वाह कसा करावयाचा याचे काही ठोकताळे बांधता आले असते व अघटित घटना टाळता आल्या असत्या. परंतु नशिबापुढे कोणाचेही चालत नाही हे खरे!!

एकूण पाच टाळेबंदपैकी पहिले दोन टाळेबंद नागरिकांनी त्याच्याशी तडजोड करण्यातच निघून गेले, तसेच करोनाच्या प्रादुर्भावाशी कसे दोन हात करावयाचे ह्यात तिसरी टाळेबंदी गडबडली. ह्यात फक्त सामान्य जनताच नव्हे तर सरकारही युद्धपातळीवर प्रयत्न करीत होते. चौथ्या टाळेबंदीपर्यंत सर्वांना ह्या करोनाची पूर्णपणे माहिती झाली व आपण आपल्या जनतेसाठी कसे व कोठे कमी पडतो ह्यावर चर्चांना उधाण आले. चौथी भित म्हणजे प्रसार माध्यमांवर उलटसुलट चर्चा रंगल्या. सरकारने जनतेसाठी तातडीचे व आटोकाट प्रयत्न केले. एका बाजूला माणसाचा जीव वाचवण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा तर दुसऱ्या बाजूला उद्यम जगताला लागलेली खीळ व पर्यायाने अर्थचक्राची गती उलट दिशेने चाललेली. त्यासाठी जगातील बहुतांश देशांनी करोनावर मात करण्याबरोबर जगरहाटी चालू ठेवणे पसंत केले व पाचव्या टाळेबंदीमध्ये अनेक सवलतींचा वर्षाव होण्यास सुरवात झाली. दुकाने,कचेऱ्या १० टक्के उपस्थितीत चालू करण्यास सांगितल्या. परंतु कचेरीत किंवा दुकानात हजेरी लावण्याकरिता वाहतुकीची सोय करून दिलेली असताना त्याचा बोजवारा उडाला कारण आपली लोकसंख्या! तसेच कुशल कामगार काम नसल्याने गावी निघून गेले आणि सरकारने काढलेल्या नाम्याप्रमाणे कारखान्यात आता कुशल कामगारांची वानवा जाणवू लागली. अर्थातच करायला गेलो एक अशी परिस्थिती निर्माण झाली. तसेच ह्यातून शैक्षणिक क्षेत्रही सुटले नाही. सर्व इयत्तातील विद्यार्थ्यांच्या आयुष्यावरही ह्या परिस्थितीचा करोनाजन्य विपरीत परिणाम झाला. त्यांची संभ्रमावस्था झाली. १०वी, १२वी आणि पदवी परीक्षेस बसलेल्या विद्यार्थ्यांच्या व पालकांच्या मनात आता पुढे काय, कधी व कसे ह्याचा बागुलबुवा नाचू लागला. तर शालेय शिक्षण घेणाऱ्यांची कथाच और!! सरकारने ऑनलाइन किंवा वर्च्युअल क्लासरूम घेण्यास किंवा सुरू करण्यास सांगितले; म्हणजे तशी घोषणाबाजी झाली खरी! परंतु सर्वच स्थरातील कुटुंबांना वर्च्युअल क्लासरूमची परिस्थिती हाताळता येणे शक्य नव्हते. टाळेबंदीच्या काळात अनेकांना पगाराविना दिवस काढावे लागले. गेले २ ते २ १/२ महिने पगार नाही. जून महिन्यात वर्च्युअल क्लासरूमसाठी फी भरावयाची तरच आपले पाल्य त्यात सामावून घेतले जाईल. तेव्हा आली ना पंचाईत!! बऱ्याच कुटुंबात घरटी एक कॉम्प्युटर आणि पालकही वर्क फ्रॉम होमच्या जाळ्यात अडकलेले; तेव्हा; कोणी, कधी व कसा कॉम्प्युटरचा वापर करावयाचा हेच मोठे कोडे पडले आहे. असे जरी असले तरी सवलतींच्या वर्षावांचा विपरीत परिणाम न होवो ही ईश्वर चरणी प्रार्थना!!!

सर्वांनी ह्याचा मोकाट सुटल्याप्रमाणे फायदा न उठवता योग्य वर्तणुकींनी स्वत:ला व इतरांना कोविडपासून दूर राहण्याचे आचरणात आणले तर खरोखरच सर्व आलबेल होईल आणि तेव्हा होईल पुन:श्च हरी ओम !!!

(मोबाईल: ९८१९४१९६५५)

# करोना, लॉकडाऊन आणि मी

-आरती कोठारे

नमस्कार मंडळी.

आपल्याला एव्हाना करोनासोबत रहाण्याची चांगलीच सवय झाली असेल. लॉकडाऊन संपून आता ओपनअपची चाहूल लागतेय. करोनावरील औषधाची आपण सर्वजण आतुरतेने वाट पाहात आहोत. पण मी आज तुम्हाला मला गेल्या ३ महिन्यात आलेले काही अनुभव सांगणार आहे.

तर करोना हा एक विषाणू असून तो संपूर्ण जगभरात पसरलेला आहे आणि त्यामुळे कित्येक निष्पाप 'जीव' त्रासलेले असून अनेकजण मृत्युमुखी पडले आहेत. हो... 'जीव'च म्हणेन मी. त्याचं काय आहेना की आम्ही सगळे लॉकडाऊन सुरू होण्याआधीच इथे गावाला आलोय त्यामुळे आमच्या मुंबईच्या घरच्या म्हणजे कुंडीतल्या झाडा-रोपांनी पाण्यासाठी अंग झोकून दिलं असून त्यांना आत्तापर्यंत सद्‌गती नक्कीच प्राप्त झाली असेल.

तसेच रस्त्यावरच्या कुत्र्या-मांजरांना नेहमीची बिस्किटं देणारंही फारसं कोणी उरलं नसेल असा विचार क्षणभर मनात येऊन जातो. म्हणजे माणसंच नाहीतर असे इतर जीवही या महामारीत भरडले जात आहेत. म्हणून 'जीव'...

असो...सध्या आम्ही इकडच्या झाडापानांमध्ये रमलोय. प्रदुषणमुक्त आणि निसर्गसमृद्ध वातावरणात स्वछंदपणे जगतोय.

असं ऐकतोय की आता या लॉकडाऊनमुळे शहरातले वातावरणही प्रदुषणमुक्त झाले आहे. किती छानना!

मला खात्री आहे की आमच्यासारखी कित्येक माणसं त्यांच्या गावाला जाऊन शेतीची कामे करत असतील. पण जी शहरात अडकून पडली आहेत त्यांचं जीवन साधारण कसं असेल ह्याचा अंदाज फोनकॉल्स आणि व्हॉट्सॅप फॉरवर्डस्-वरून येतो. पुरुषांच्या मानाने स्त्रियांची परिस्थिती बरी असावी कदाचित. पुरुष मंडळींना सवय नसल्याने वर्क फ्रॉम होम आणि वर्क फॉर होम (घरकाम) महागात पडत असण्याची दाट शक्यता आहे. तसेच त्यांचे नेहमीचे गप्पांचे विषयही बदलून घरकाम-विषयक झाले आहेत हेच यासर्व व्हॉट्सॅप संदेशांमधून दिसून येते.

तसं ह्या लॉकाऊनमुळे एक गोष्ट मात्र चांगली झाली आहे ती अशी की कुटुंबातील सर्व सदस्य दिवसाचे अगदी २४ तास एकत्र असण्याचा दुग्धशर्करायोग जुळून आला आहे.

मुले आणि मोठी मंडळी अनेक नवनवीन गोष्टी शिकत आहेत किंवा आपापले एरव्हीच्या धकाधकीत मागे पडलेले छंद पूर्ण करत आहेत. मीसुद्धा आई आणि आजीकडून थोडा थोडा

(पान ५ कॉलम १ वर)

नाळ

# वलय

-हेमंत विनायकराव तळपदे

मंडळी, आज मी एका नवीन विषयावर लिहिणार आहे. तसे पाहता प्रत्येक मानव या भूतलावर जेव्हा जन्म घेतो तेव्हा त्याचा भविष्यकाळ काय असेल हे कोणालाच माहीत नसते. परंतु पुरातन काळात आणि कधीकधी सध्ययुगात ज्योतिषशास्त्राचा आधार घेऊन त्या बाळाच्या भविष्याचे काही ठोकताळे अंदाजिले जातात. हे बाळ मोठेपणी फार कर्तृत्ववान होईल, तुमच्या घराण्याचे नाव उज्ज्वल करेल, इतकेच काय, हे बाळ अल्पजीवी आहे असाही ज्योतिषी अंदाज वर्तवितात. मग त्या बाळाच्या भविष्यासाठी पूजाअर्चा, होमहवन, धागे, ताविज, नवस इत्यादी उपाय केले जातात. पण भविष्यात हे बाळ नक्की कोण होणार याची कोणालाही सुतराम कल्पना नसते. ब्राह्मणाचे पोर असेल तर ते पूजापाठ करणार, क्षत्रियाचे पोर युद्ध करणार, वैश्याचे पोर व्यापारउदीम करणार ही पूर्वपिठीची एक प्रथाच होती. आता सर्व काही बदलत चालले आहे. शुद्राचे पोरही आता समाजात मोठ्या मानाच्या हुद्दयावर आढळते तर ब्राह्मणाचे पोर कधीकधी तुरुंगात खितपत पडलेले सापडते.

या सर्व नांदीचा ऊहापोह करण्याचा माझा उद्देश तर फारच निराळा आहे. आपणास कदाचित् पटणार नाही. पण मी तर म्हणेन की, प्रत्येक सजीवाला आपल्या जन्माबरोबर एक वलय लाभलेले असते. याची प्रचिती आपणास खास करून धार्मिक चित्रपट पाहताना येते. यात सूर्यदेव, अग्नीदेव, इंद्र, विष्णू, गणेश इतकेच काय तर आई जगदंबा, दुर्गा इत्यादी देवदेवी दाखवताना त्यांच्या मस्तकामागे एक खास प्रकाशित वलय दाखविले जाते. हे वलय त्यांची प्रतिभा दर्शवते व आपण त्या देवदेवींना पाहून नतमस्तक होतो. पण मी तर म्हणेन केवळ देवयोनीच नव्हे, तर मानवयोनीतल्या प्रत्येकालाच हे वलय लाभले आहे. ते दृष्य नाही; पण बऱ्याचदा ते आपल्या अंत:चक्षूना दिसते.

आता तुम्ही म्हणाल हे कसे संभव आहे? हा केवळ भ्रम आहे. आपल्या सिनेसिनेमांमध्ये देवदेवींना दाखवताना निर्माण केलेली ती एक आभासी कल्पना आहे. मानवाचे शरीर हेच केवळ चिरंतन सत्य आहे. त्याला भोवताल नाही. पण यावर बारकाईने विचार केला तर हे असंभवही नाही. उदाहरण देतो.

प्रत्येक माणसाला देवाने या भूतलावर एक नियतकर्म करण्यास पाठविले आहे. भगवत गीतेमध्येही श्रीकृष्णाने अर्जुनाला उपदेश करताना यावर भाष्य केले आहे. मग हे नियतकर्म सत्कर्म असो की दु:कर्म. हे ज्याच्या त्याच्या दैवगतीवर अवलंबून आहे. पण ही दैवगती कोण ठरवतो? देव हे त्याचे उत्तर नाही. ही गती आपल्या गतजन्माचे आणि या जन्माच्या संचित पापपुण्याचे गाठोडे आहे. प्रत्येक जीवाला त्याच्या जन्माबरोबर एक वलय लाभलेले असते. आपण जसजसा अधिक पुण्यसंचय करतो तसतसे ते वलय तेजस्वी होत जाते. आणि जर एखादा मानव पापकर्म करू लागला तर ते वलय फिकट होत जाते. सहजासहजी ते वलय आपल्या डोळ्यांना दिसतही नाही. पण प्रत्येकाला ते कोणत्याना कोणत्या रूपात अनुभवायला मिळते. जी माणसं पुण्यकर्म करतात त्यांच्या चेहऱ्यावर कळत नकळत सोज्ज्वळ भाव दिसतात. समोरच्या व्यक्तीला ते भाव सहज जाणवतात व अशा माणसाजवळ आपण चुंबकासारखे सहज ओढले जातो. माझे काही मित्र, आप्तस्वकीय, विद्यार्थी मला जवळचे का वाटतात व इतरांबद्दल इतका जिव्हाळा का वाटत नाही याचे उत्तर हे वलयच आहे असे मी म्हणेन.

याउलट जी माणसे जाणूनबुजून दु:कर्म करतात, एखाद्याचा खून करतात, संपत्ती लुबाडतात, स्त्रियांवर अत्याचार करतात वा देशविघातक कृत्ये करतात त्यांच्याबाबतीत हे वलय बरेचसे फिकट होऊ लागते. पण ते पूर्णपणे नष्टही होत नाही, हेही खरे. या इसमांजवळ कधीकधी गडगंज संपत्तीही असते, सत्ता असते, आजुबाजूला तोंडपुंजे अनुयायी अथवा सेवकही असतात. बऱ्याचदा ही माणसे सत्ता ओरबाडूनही घेतात व तिचा मनसोक्त उपभोगही घेतात. पण सरतेशेवटी ते जीवनाच्या अशा टप्प्यावर येतात की, त्यांच्यासोबत खऱ्या अर्थाने राहण्यास कोणीही उरलेला नसतो. कारण हे वलय फिकट होत गेल्याने त्यांच्यातील चुंबकशक्ती नष्ट होते. त्याच्या मरणानंतर अनेक लोक स्मशानात गर्दीही करतात, पण तिथेही हे मित्रगण, आप्तस्वकीय खाजगीत हा माणूस किती दु:खी होता याचीच कुजबूज करतात. ही जगाची एक रीतच आहे.

तर मंडळी, या भ्रमात राहू नका की, हे वलय फक्त श्रीमंतांनाच प्राप्त होते. तसे अजिबात नाही. कोणताही सज्जन हे वलय तेजस्वी करू शकतो. मग तो महानगरपालिकेचा सफाई कामगार असो, बँकेतला कारकून असो, व्यापारी असो अथवा शिक्षक वा नेता असो. लक्षात ठेवा, मी तुम्हाला प्रथमच सांगितले आहे की, हे वलय दृष्य नाही. फक्त त्याची जाणीव आपल्या मनाला होते.

आता तुम्हीच तुमची उजळणी करा. आतापर्यंतच्या आयुष्यात तुम्ही किती सत्कर्मे केलीत? किती लोकांना निस्वार्थी मदत केली? कितीवेळा इतरांच्या सुखासाठी शारीरिक क्लेश सोसलेत? किती व्यक्तींना अनमोल मार्गदर्शन केलेत? आपण करीत असलेल्या नियतकर्मात किती प्रामाणिक राहिलात? आपल्या अंतर्मनाबरोबर किती तडजोडी केल्यात? आपल्या निमित्तस्वार्थासाठी किती लोकांना फसवलेत? याची एक यादी मनोमन करा. मग आपणास कळेल की आपल्या मस्तकी हे वलय किती गडद आहे. तसे पाहता आपण मध्यमवर्गीय एका प्रकारचे पापभिरू जीवन जगत असतो. माझी नोकरी भली, घर भले इतकाच माफक विचार आपण करत असतो. पण कधीकधी प्रासंगिक लोभापायी आपला तोल घसरतो. मग कामावरील पदाचा फायदा उठवत

(पान ५ कॉलम ४ वर)

Just A Thought

# MEMORIES

-Sou. Achala Subhash Desai

Each one of us has a treasure of memories. This collection increases as one ages. As we go through different stages of life, the experiences are vivid. They are stored in our brain as memories. It depends on the smartness of our brain as to how much and what to store. Each one goes through good and bad times during one's life span. It is upto you to retain the good memories and delete the bad ones. It is natural for a person to seek help of the past during a period of crisis. The pleasant episodes stored in the memory compartment of the brain act as an oasis in the desert of life.

Many a times I take the help of my Memory Bank and look out for Credit of Good memories. The unwanted are delited from time to time. My memory takes me to my chidhood. This was an enjoyable phase of life which is full of pleasant memories.

A little girl aged about 8 years in school uniform comes running to me and says "girlie girlie what is your name?". And from here starts a relationship with one best friend Devika. Every morning at about 7.15, there would be a kokila calling out to me Achilaaa... Then we two would be trotting to school. Never went to school without her. On the way back from school, we would indulge in an ice-gola sometimes. She always chose the colourless one and I the red one. Tell me why? Simple… her amma would be home and my aai would be at work in the office! so she could be caught by amma! Its sixty years now that we still share our highs and lows.

Being a Bandraite, I grew up among Christian neighbours. My neighbour Tellis Ajji was a Grandmother to me and my two brothers when aai was away at work. She made awesome meat and fish curry in the Manglorean style. Very often I went to her for my share of the curry on my plate of rice. I helped her to grind the coconut based masala on the stone grinder which is called 'ragda'. Her chicken sandviches were extraordinary. I waited for my share on some festive days and just one sandvich was enough to satisfy me.

The best period in a year was the onset of summer. Schools closed for the summer vacation and plans to go to " Mama chya gavala " were on the cards. My maternal ajji stayed just a station away; but so what? It was still going to mama chya gavala!

It was a fun gathering of my cousins from all over Mumbai to spend a few days with mama, mami and family. The mango tree in the compound stood magestically laden with the fruit. All of us eyed for some tangy pieces of kairi with salt and mirchi powder. But the magestic matriarch sat in the balcony watching over the crop. Ajji would not miss her afternoon siesta, and we naughty grandchildren would not miss this chance of plucking the fruit. Then it was party time, ofcourse with the help of neighbour Murudkar maushi.

Memory lane is very long and the treasures are a boxful. The ugly memories do prop up, but I know how to tap them down.

The good memories really help me to cope up with the otherwise mundane life. Of course cannot rely on them all the time.

Accept your past without regret , handle your present with confidence and face your future without fear.

(Mobile: 9819125660)

✳

स्मरणरंजन

# तारायंत्राचे युग

-विश्वास अजिंक्य

दूरसंदेशवहन म्हणजे एका ठिकाणाहून काही अंतराच्या दुसऱ्या ठिकाणी एखादा संदेश वाहून नेणे. फार प्राचीन काळापासून संदेशवहनाची कला माणसाला अवगत होती. पूर्वी हे काम विविध माध्यमातून केले जाई. कधी एका ठिकाणी धूर करून त्याद्वारे दुसऱ्या ठिकाणच्या लोकांना इशाऱ्याचे संदेश दिले जात. तर कधी ढोल नगारे वाजवून हातवारे करून किंवा हातात धरलेल्या वस्तूंच्या किंवा झेंड्याच्या विशिष्ट हालचाली करून संदेशाची देवाणघेवाण करीत. त्याचबरोबर प्रकाशझोतांच्या सहाय्यानेदेखील संदेश पाठवून सूचना दिल्या जात. पुढे यात सुधारणा होत जाऊन तंत्रज्ञानाचा विकास होऊन टपाल, तारायंत्र, दूरध्वनी, फॅक्स व त्याबरोबरीनेच बिनतारी संदेशवहन जसे आकाशवाणी, दूरचित्रवाणी आणि आजच्या आधुनिक काळात उपग्रहाद्वारे संदेशवहन, संगणक, इंटरनेट, इ-मेल अशी संपर्क माध्यमे अस्तित्त्वात आली आहेत. नवी माध्यमे आली की आधीची त्या ओघात नाहीशी होतात. बंद पडतात. भारतात एकेकाळी अत्यंत प्रभावी असलेले तारायंत्र (telegraph) हे माध्यम मोबाईल, इंटरनेट, ई-मेल यांच्या प्रभावामुळे असेच बंद झाले.

तारायंत्राचा शोध सॅम्युएल मोर्स या एकोणिसाव्या शतकातील प्रख्यात अमेरिकन चित्रकाराने लावला. त्याने अनेक जागतिक कीर्तीच्या व्यक्तींच्या, राजकारण्यांच्या तसबीरी चितारलेल्या होत्या. १८२५ साली अमेरिकन स्वातंत्र्य लढ्यातील अग्रेसर फ्रेंच सेनानी जनरल लाफायेत याचे पोर्टेट काढण्याची संधी त्याला मिळाली. सूर्यास्ताच्या भव्य पार्श्वभूमीवर या चित्राचे काम ऐनभरात असताना, मोर्सला त्याची बायको आजारी असल्याचे त्याच्या वडिलांचे पत्र मिळाले. काढत असलेले चित्र अर्धवट टाकून मोर्स तातडीने न्यू हेवन येथील आपल्या घरी परतला. पण त्याला उशीर झाला होता. त्याच्या पत्नीचे केव्हाच निधन झाले होते आणि तिचा दफनविधीही आटोपण्यात आला होता. पत्नीच्या आजारपणाची आणि निधनाची बातमी त्याला फार उशीराने मिळाली होती. त्याकाळी जलद दळणवळणाची साधने उपलब्ध नव्हती. एका ठिकाणाहून दुसरीकडे संदेश पोहोचविण्यास फार वेळ लागत असे. स्वत:ला आलेल्या कटू अनुभवामुळे, लांब अंतरावर त्वरीत संदेश पोहोचविण्यासाठी काहीतरी उपाय शोधण्याचा त्याने मनाशी निश्चय केला. आपली चित्रकला त्याने बाजूला सारली आणि अमेरिकन भौतिक शास्त्रज्ञ जोसेफ हेन्री आणि आल्फ्रेड विल यांच्या मदतीने विद्युत चुंबकीय तारायंत्र विकसित करून त्याद्वारे संदेश पाठविण्यासाठी मोर्स लिपी तयार केली. या लिपीमध्ये डॉट (.) आणि डॅश (-) या विद्युत स्पंदनांचा (electric pulses) वापर केला होता. या दोन प्रकारच्या सिग्नल्ससाठी यंत्राच्या 'कट्ट' आणि 'कडड' या तारायंत्रा-मधून निघणाऱ्या स्पष्ट ध्वनीचादेखील संदेश पाठविण्यासाठी उपयोग केला गेला. संदेश पाठविण्याची ही पद्धत जगभर स्वीकारली गेली. सुरुवातीला तारायंत्राचा वापर युद्धविषयक बातम्या कमी वेळात पाठविण्यासाठी केला गेला. त्याआधी या बातम्या घोडे, गाड्यांचा वापर करून टपाला-द्वारे पाठविल्या जात. हे काम फार वेळ खाऊ आणि धोकादायक असे. तारायंत्रामुळे हे काम सोपे, जलद आणि निर्धोक झाले. पुढे महत्त्वाचे संदेश जलद पाठविण्यासाठी नागरी सेवेत तारायंत्रे वापरात येऊ लागली. या माध्यमातून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पैसे पाठविण्याची सोयही उपलब्ध झाली.

भारतात तारायंत्राचे युग एकोणिसाव्या शतकाच्या मध्यावर भारत पारतंत्र्यात असताना अवतरले. भारतात १८५१ साली 'ट्रान्स इंडिया टेलिग्राफ' या नावाने पहिल्या तारायंत्राची स्थापना करण्याचे काम सुरू होऊन तीन वर्षांनी म्हणजे १८५४ साली हे काम पूर्ण झाले. पहिली जवळजवळ तीस वर्षे भारताच्या कानाकोपऱ्यात होणाऱ्या स्वातंत्र्यलढ्यासंबंधीची माहिती गोळा करणे आणि त्वरित संदेश पाठवून ती आंदोलने, उठाव चिरडण्यासाठी आणि भारतावर आपला एकछत्री अंमल कायम राखण्यासाठी तारायंत्र हे ब्रिटिश सरकारसाठी एक महत्त्वाचे साधन बनले होते. हे माध्यम एवढे प्रभावी होते की स्वातंत्र्यलढ्याचा बिमोड करण्याचे ब्रिटिश सरकारचे प्रयत्न हाणून पाडण्यासाठी तारलाईन्स तोडणे, उद्ध्वस्त करणे आणि ब्रिटिशांची दळणवळण यंत्रणा खंडित करणे हा क्रांतिकारकांच्या लढ्याचा एक प्रमुख भाग होऊन बसला होता.

पुढे १८८५ साली 'भारतीय तारायंत्र अधिनियम-१८८५' हा कायदा ब्रिटिश सरकारने भारतात लागू केला. या अधिनियमानुसार तारायंत्र, दूरध्वनी, दळणवळण, रेडिओ या

(पान ५ कॉलम १ वर)

मनोमनी

# मूषक संहार

-रसिक विजयकर

एका सकाळी ऑफिसला माझ्या कारमधून जात होतो. रहदारी जास्त नसल्यामुळे थोड्या वेगातच गाडी चालवत होतो. कारमधल्या म्युझिक प्लेयरवर लागलेले गाणे मीदेखील गुणगुणत होतो. पण अकस्मात मला वाटू लागले की मी कारमध्ये एकटा नाही. दुसऱ्या कोणाचे अस्तित्व तेथे आहे. असे मला वाटते न वाटते तोच मला समोर काचेवर, बाहेरून एक काळाकुट्ट उंदीर मोठाले डोळे व दात विचकून माझ्याकडे पाहात होता. क्षणभर मला धडकीच भरली. पण दुसऱ्याच क्षणाला मी माझी गाडी जोरात बाजूला घेतली व ब्रेक दाबला. ज्यायोगे तो उंदीर गाडीच्या बाहेर पडेल. पण कसले काय! तो गाडीच्या वायपरला लटकून बसला होता, जसे सर्कसमध्ये कसरतपटू झोपाळ्यावर लटकत असतात तसे!

एकदा माझ्यातली भीती थोडी कमी झाल्यावर माझ्या लक्षात आले मी कारमध्ये सुरक्षित आहे व तो कारच्या बाहेर आहे. मी आणखी सुरक्षितेसाठी कारच्या खिडक्या व दरवाजे बंद करून घेतले. आता पुढे काय करावयाचे ह्याचा विचार करू लागलो. त्याला असे हुसकावून शकलो नाही पण मी त्याच्यावर पाण्याचा मारा करू शकतो. मी पुढील काच धुण्यासाठी 'विंडो वॉशर' असतो त्याचा उपयोग करण्याचे ठरविले. आता मला धीर आला होता. मी त्याच्यावर पाण्याचा मारा सुरु केला. ह्या लढाईत मी विजयी होणार ह्याची मला खात्री होती. मी स्वत:शीच हसलो. पण दुसऱ्याच क्षणी त्या उंदराने काय करावे? एक पाय वरती केला आणि थोड्या वेळाने दुसरा पाय वरती करून सर्व अंग धुऊन घेतले. जसे काय मी त्याला आंघोळ घातल्याबद्दल मला धन्यवाद देत होता. शेवटी आपली शेपटी उंचावत आतल्या हूडमध्ये नाहीसा झाला.

मला आता ऑफिसमध्ये जावयाचे असल्याने त्या उंदराचा नाद तात्पुरता सोडला. ऑफिसमधून परत येताना मला त्या उंदराची आठवण झाली व त्याला कारच्या हूडमधून हुसकावण्यासाठी एक लहानशी काठी घेतली. पहिल्या प्रथम कारचे हूड उघडले, तर मला काय दिसले? आतमध्ये सर्वत्र शेंगाची टरफले व पाने विखुरली होती. पण तो कोठे नाहीसा झाला होता. मी सर्व कचरा बाहेर काढला. त्याचे सर्व खाणे मी तेथून काढून टाकल्याचे मला समाधान वाटत होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी ऑफिसला जाण्याआधी खबरदारी म्हणून आधी हूड उघडून पाहिले तर काय; एका कोपऱ्यात तो आपले मोठाले डोळे वटारून माझ्याकडे पहात होता. जणू काय परत तो मला आव्हान देत होता. माझे डोके सणकले. मी गाडीत ठेवलेली काठी घेतली व त्याच्यावर वार करण्याचे ठरविले. पण हाय, तो एका जागेवर स्थिर नव्हता. इंजिनाच्या एकेका भागावरून दुसऱ्या भागावर, एअर फिल्टरवर, कारबोरेटरवर उड्या मारत होता. मीदेखील कशाचीही पर्वा न करता त्या त्या ठिकाणी काठी आपटत होतो. ह्या गडबडीत तो एका लहानशा फटीतून कोठे नाहीसा झाला.

आता आणखी खबरदारी म्हणून मूषक संहारक औषधे हूडमध्ये पसरून ठेवली. जो जो सांगेल त्या औषधाचा मारा केला. मुख्यत: तो ज्या फटीतून गायब झाला होता त्या भागावर जास्तच. दोन दिवस झाले. आता त्याचा मागमूस नव्हता, बहुतेक दुसऱ्या ठिकाणी स्वारी गेली होती अथवा औषधाचा मारा होऊन तो निजधामास गेला होता. शेवटी माझा विजय झाला होता!

आज सकाळी आमच्या शेजारचा पिंटू आला होता. तो जरा हिरमुसला होता. मी त्याचे कारण विचारले. त्याचा पाळीव उंदीर पिंजऱ्यातून पळाला होता व नाहीसा झाला .माझी पिंटूकडे नजरेस नजर देण्याची हिम्मत राहिली नाही.

''अहो, उठा आता, बाप्पाची आरती करून घेऊ या. उशीर नको.'' सौ.ने मला जागे केले. म्हणजे आतापर्यंत स्वप्नात होतो. माझ्याकडून मूषक संहाराचे पातक न झाल्यामुळे मी मनोमनी सुखावलो. मी आरतीला उभा राहिलो. पण का कोणास ठाऊक वरचेवर मला वाटत होते की, गणेशाच्या पायाशी असलेले मुषकराजे माझ्याकडे बघून मिशीतल्या मिशीत हसत होते!

(मोबाईल ९८१९२७६६६६)

*

(पान २ कॉलम ४ वरून)

स्वयंपाक शिकत आहे. आईला आमच्या शेतमालाच्या प्रक्रिया उद्योगात मदत करत आहे. शेतीची कामेही शिकत आहे, वारली चित्रकला व फोटोग्राफी करत आहे आणि अभ्यासही करत आहे.

सध्या फेसबुक आणि इंस्टाग्रामवर कित्येक लोक अनेक नवनवीन पदार्थ बनवून त्यांचे फोटोज टाकत आहेत. लॉकडाऊनला जणू सुट्टीचा आनंदच उपभोगतायत. ह्यावर व्हॉट्सॅपवर आलेला एक संदेश मला खूपच आवडला- 'आपल्याला करोना संपवायचा आहे...किराणा नाही'.

पण लॉकडाऊनच्या काळातला माझा सर्वांत लक्षात राहिलेला दिवस म्हणजे २ मे २०२०. ह्या दिवशी मी आणि माझे बाबा वाणसामान आणायला बाहेर पडलो होतो. सकाळी साडेसहालाच गाडी घेऊन बाहेर निघालो, एक कप ब्लॅक कॉफी पिऊन. गावात फारसं काही मिळत नसल्याने सामान आणायला कमीतकमी ३.५ कि. मी. दूर जावं लागतं. गावाच्या बाहेर पडताच पोटात गोळा आला. सगळीकडे भयाण शांतता, मधूनच एखाद दुसरा माणूस दिसायचा तोही मास्क घातलेला... जणू कोणी परग्रहवासीच.

लॉकडाऊनमध्ये बाहेर पडण्याची माझी ही पहिलीच वेळ. एकेक काम आणि खरेदी आटपत आम्ही बँकेपर्यंत आलो. बँकेबाहेरील आवारात सोशल डिस्टन्सींग पाळलं जावं म्हणून थोड्याथोड्या अंतरावर काही चौकोन आखले होते. अपेक्षा अशी होती की प्रत्येक चौकोनात एकेका माणसाने उभे रहावे. परंतु गंमत अशी की जमलेल्या प्रत्येकाने आपला नंबर लागावा म्हणून आपापल्या चपला त्या त्या नंबराच्या चौकोनात ठेवल्या आणि ही सर्व 'निरागस' मंडळी बाजूच्या एका बाकड्यावर - छानपैकी सावलीत - एकमेकांना अगदी खेटून बसली होती. सोशल डिस्टन्सींगचं असं जगावेगळं रूप पाहून मला हसावं की रडावं हेच कळेना.

बँकेतलं काम उरकून साधारण साडेनऊच्या सुमारास आम्ही गॅस सिलिंडर घेण्यासाठी गॅस स्टेशनवर पोहोचलो. त्यांच्याकडचे गॅस सिलिंडर्स संपले होते. पुढचे सिलिंडर्स बारा वाजता येणार होते. इतक्या लांब येऊन गॅस न घेता परत जाणे आणि परत पुढच्या दिवशी त्या एका सिलिंडरसाठी वेळ आणि पेट्रोल वाया घालवून इथवर येणं हे काही पटण्या जोगं नव्हतं. मग काय? थांबलो आम्ही एका बाजूला. आमचा पहिलाच नंबर होता कारण गॅस संपल्यावर आम्ही एकटेच थांबलो होतो. हळूहळू बाकीची म्हणजे जवळच्या गावांतली माणसं त्यांचे रिकामे सिलिंडर्स घेऊन आली. आपण जसं २०लिटरच्या पाण्याच्या कंटेनरला बाटला म्हणतो तसंच इकडची लोकं ह्या सिलिंडरलासुद्धा 'बाटला'च म्हणतात हे तेव्हा कळलं. बघताबघता आमच्यामागे ५०-६० 'बाटले' येऊन ठेपले. तहान लागली होती आणि भूकही. इतकं थांबावं लागेल असा विचारच केला नव्हता. त्यामुळे आम्ही साधी पाण्याची बाटलीसुद्धा आमच्याबरोबर घेतली नव्हती. एवढ्यात आठवले की सकाळी घरून निघताना दूध आणण्यासाठी घेतलेल्या चिलरबॉक्समध्ये बर्फ कमी पडत असल्याने आम्ही गोठलेल्या पन्ह्याची एक बाटली मुद्दाम ठेवली होती. तीच आता आमच्या कामी आली. मी आणि बाबा-जास्त करून मीच - ते पन्हं थोडं थोडं वितळल्यावर पीत होतो. पायही खूप दुखत होते. इतका वेळ उन्हात उभं रहाणं हे काही सोपं काम नव्हे. कधी आम्ही बाहेर दगडावर बसलो तर कधी आमच्या त्या रिकाम्या बाटल्यावर. अशाप्रकारे पोटाची आणि पायाची कळ काढता काढता दुपारचा एक वाजला. शेवटी सव्वाला तो बाटले भरलेला ट्रक आला एकदाचा.

सर्वांनाच खूप हायसं वाटलं.ज्या ट्रकची इतक्या आतुरतेने मी वाट पाहिली होती त्यावरून आता माझी नजरच हटत नव्हती.

शेवटी आम्हाला आमचा नवीन बाटला मिळाला. तो गाडीत टाकून आम्ही तडक घरी निघालो. दोन वाजता घरी पोहोचलो. पोटात कावळे कोकलत होते. तरीही सर्वांत आधी आंघोळ! करोना आहेना... काळजीतर घ्यायलाच पाहिजे. मग पावणेतीनला जेवायला बसलो.

बरं, जेवणावरून आठवलं-चक्क परभी असूनही गेल्या ३ महिन्यांच्या आमच्या इथल्या वास्तव्यात मला माझी नॉनव्हेजची भूक फक्त अंड्यांवरच भागवावी लागली! कारण करोना सुरू झाल्यापासून इथे कुठेही बाजार, कोंबड्या, वगैरे मिळणं पूर्णत: बंद झालेलं आहे. आता बघूया माझा हा 'उपवास' कधी संपतोय ते...

बाकी तसे आम्ही इकडे एकदम मजेत आहोत - टी.व्ही. वगैरे नसतानाही. लॉकडाऊन सुरू असताना कित्येक लोकांसमोर 'काय करायचे?' असा प्रश्न पडला असताना आमच्याकडे मात्र कामांची काहीच कमी नाही. दिवसभर भरपूर काम आणि रात्री समाधानाची झोप... अजून काय पाहिजे?

परंतु ओपनअप झाल्यावर परतावं लागणारच आहे. एव्हाना तुम्हा सगळ्यांना करोनासोबत शहरात राहताना पाळावे लागणारे प्रतिबंध व घ्यावयाची काळजी यांची नक्कीच चांगली सवय झाली असेल. आम्हाला मात्र हे सगळं नव्याने आणि काटेकोरपणे पाळणे शिकावे लागणार आहे. शेतावरच्या मोकळ्या वातावरणाला मागे टाकून शहरातल्या बंदिस्त वातावरणाशी पुन्हा जुळवून घ्यावे लागणार आहे.

असो... तर मंडळी आतापर्यंत आपण म्हणत होतो 'Stay Home : Stay Safe' पण ओपनअपनंतर घराबाहेर तर पडावंच लागणार. शाळा, कॉलेजेस, ऑफिसेस... हळूहळू सारे काही सुरू होईल. अर्थचक्र पुन्हा सक्रिय होऊन फिरू लागेल. त्यामुळे मीतर म्हणेन "Wherever you go...Stay Safe".

*

---

(पान ४ कॉलम २ वरून)

सेवांच्या वापरावर सरकारी नियंत्रण आले. यामुळे तारायंत्र जोडणीसाठी केबल्स टाकणे, जागोजागी तार केंद्राची उभारणी करणे, दूरध्वनी केंद्राची स्थापना, विशिष्ट परिस्थितीत खाजगी फोन टॅप करणे, खाजगी जमिनींचे अधिग्रहण करणे; अशासारखे अधिकार सरकारला मिळाले आणि तारायंत्राचे जाळे झपाट्याने भारतभर पसरले.

स्वातंत्र्य मिळाल्यानंतर तार व टपाल खात्याच्या कामकाजात अनेक सुधारणा करण्यात आल्या. आणि तारयंत्रणा जास्त सक्षम व लोकाभिमुख झाली. आजची एस. एम. एस; ई-मेल, मोबाईल फोन इत्यादी सेवांचे काम पूर्वी तार व टपाल खात्याची पोस्ट कार्ड आणि तार या दोन सेवा चोख करीत असत. त्यातही तार या विषयाबद्दल सर्वसामान्यात भीती आणि उत्सुकता अशी संमिश्र भावना असे. त्यामुळे एखादी तार आली की ती उघडून पाहीपर्यंत घरातील वातावरण गंभीर होई. कधी तारेमधून आनंदाची गोड बातमीही समजे, तर कधी परीक्षेचा निकाल कळविण्यासाठी तारेचा वापर केला जाई. लष्करातील आपल्या पोस्टिंगची किंवा बदलीची वाट पहात असलेल्या जवानांसाठी तार ही एक मोठीच उत्कंठेची बाब होती. शिवाय रजा मिळविण्यासाठी 'स्टार्ट इमिजीयटली' या तारेची हे जवान आतुरतेने वाट बघत. भारतीय पुरावे अधिनियमांतर्गत (indian evidence act) 'तार' ही सेवा पंजीकृत झालेली असल्यामुळे कागदोपत्री पुरावा म्हणून कोर्टात सादर करण्यासाठी या तारांचा वापर वकील लोक मोठ्या प्रमाणात करीत. बॉलीवूडदेखील या गोष्टी-पासून लांब राहिले नव्हते. 'गांव से तार आया है'. हे वाक्य अनेक जुन्या सिनेमात असे.

१९८०च्या मध्यावर भारतभर जवळजवळ ४५००० तार कार्यालयांचे जाळे पसरलेले होते. आणि २२०००च्यावर तार कर्मचारी अव्याहतपणे दर दिवसाला सहा लाखांपेक्षा जास्त तारा देशातल्या विविध भागात पोहोचविण्याचे काम करीत होते. परंतु हळूहळू संगणक, इंटरनेट, ई-मेल, मोबाईल यांच्या प्रभावामुळे एकेकाळी कोट्यवधी भारतीयांच्या जीवनाशी समरस झालेल्या तार सेवेची उपयुक्तता उतरणीला लागली. एक एक तार कार्यालये बंद होऊ लागली. शेवटी शेवटी भारतभर फक्त ७५ तार कार्यालये उरली व सुमारे १००० कर्मचारी दिवसाला जेमतेम ५००० तारा भारतभर पोचवत होते. २००६ ते २०१२ या सहा वर्षांच्या कालावधीत 'भारत संचार निगम'ला चौदाशे कोटी रूपयांचे नुकसान झाले. यामुळे सरकारला ही सेवा बंद करणे भाग पडले. १४ जुलै २०१३ या दिवशी दिल्ली येथील सफदरजंग तार कार्यालयातून शेवटची तार पाठवण्यात येऊन १६३ वर्षे भारतात दळणवळणाचे संदेश पाठवण्याचे काम करणारे हे तारायंत्र कायमचे बंद झाले.

(मोबाईल: ९८१९०५६७४२)

**मोर्स यांची सांकेतिक लिपी**

| मुळाक्षरे | मोर्स यांची संकेत मुळाक्षरे | मुळाक्षरे | मोर्स यांची संकेत मुळाक्षरे |
|---|---|---|---|
| A | ● - | U | ● ● - |
| B | - ● ● ● | V | ● ● ● - |
| C | - ● - ● | W | ● - - |
| D | - ● ● | X | - ● ● - |
| E | ● | Y | - ● - - |
| F | ● ● - ● | Z | - - ● ● |
| G | - - ● | 1 | ● - - - - |
| H | ● ● ● ● | 2 | ● ● - - - |
| I | ● ● | 3 | ● ● ● - - |
| J | ● - - - | 4 | ● ● ● ● - |
| K | - ● - | 5 | ● ● ● ● ● |
| L | ● - ● ● | 6 | - ● ● ● ● |
| M | - - | 7 | - - ● ● ● |
| N | - ● | 8 | - - - ● ● |
| O | - - - | 9 | - - - - ● |
| P | ● - - ● | 10 | - - - - - |
| Q | - - ● - | पूर्ण विराम | ● - ● - ● - |
| R | ● - ● | स्वल्प विराम | - - ● ● - - |
| S | ● ● ● | प्रश्न चिन्ह | ● ● - - ● ● |
| T | - | उद्गार चिन्ह | ● - ● ● - ● |

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणाची डायरी

### मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०४-०६-२० | श्री. अनिल गजेंद्र जयकर | वय ७१, | वडाळा |
| १५-०६-२० | श्री.उमेश गजानन कोठारे | वय ८६, | वांद्रे |
| १७-०६-२० | श्री. राजवर्धन कृष्णनंदन आगासकर | वय ७३, | वांद्रे |
| २८-०६-२० | डॉ. उषा रघुवीर कोठारे | वय ८७ | गावदेवी, मुंबई |
| २९-०६-२० | श्री. सुभाष केशवराव कोठारे | वय ८५ | सांताक्रूझ |

*चुकीची दुरुस्ती* : जूनच्या प्रभुतरुणातील मरण सदरात ०३-०६-२० **सौ. आशा विनोद कोठारे** असे वाचावे

## अभिनंदन

✶ 'पार्ले टिळक विद्यालय असोसिएशन'चे शंभरावे वर्ष दिनांक ९ जून, २०२० रोजी सुरू झाले. त्यासंदर्भात यादिवशी ऑनलाईन सोहळा झाला. या संस्थेच्या संचालक मंडळात असलेले संस्थेचे खजिनदार आणि आमचे विश्वस्त श्री. बन्सी धुरंधर यांनी या सोहळ्यात संचालक मंडळाचा परिचय करून दिला.

✶ सध्याच्या 'लॉकडाऊन'च्या काळात सॉलि. श्री. राजन जयकर समोरचे आकाशचित्र आपल्या कॅमेऱ्यात टिपत असतात. त्यापैकी एक छायाचित्र त्यांच्या स्वत:च्या तसबिरीसह 'मिड-डे' या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झाले. त्याचप्रमाणे V CAN या संस्थेचे विश्वस्त असलेल्या सॉलि. राजन यांनी ३० जून २० रोजी 'मान्सून- कोविड आणि तुमची सुरक्षा' या विषयावर अतिरिक्त महानगरपालिका आयुक्तांचे ई-व्याख्यान आयोजित केले.

✶ आमचे सदर लेखक श्री. रसिक विजयकर यांनी त्यांच्या सदर लेखनाचेच 'मनोमनी' हे ई-पुस्तक प्रसिद्ध केले.

✶ आमच्या कार्यकारी संपादिका असलेल्या सौ. मीनाक्षी कौशिक जयकर यांची १० जून, २० रोजी 'अस्मिता वाहिनी'च्या 'सहजसंवाद' मध्ये ऑनलाईन मुलाखत घेण्यात आली.

✶ १ जुलै, २० रोजी प्रसिद्ध झालेल्या 'ललित' मासिकात मृदुला प्रभुराम जोशी यांचा अरुण फडकेंवर लेख प्रसिद्ध झाला. त्याच अंकात प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांचे 'लक्ष्यवेधी' सदर आहे.

✶ आषाढी निमित्ताने पं. योजना शिवानंद यांनी ई-पुस्तक (आणि मुद्रित पुस्तकही) प्रसिद्ध केले. याला प्रस्तावना प्रा. सुहासिनी कीर्तिकर यांची आहे. (जी अनेक मान्यवरांनी वाखाणली.) तसेच मुं. म. साहित्य संघातर्फे घेण्यात आलेल्या ऑनलाईन कथा, पत्रलेखनाच्या स्पर्धेत त्यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले.

✶ सौ. प्रतिमा विनोद प्रधान यांनी बावीस पानी 'ई-रेसिपीबुक' प्रसिद्ध केले.

✶ हिरानंदानी इस्टेट, ठाणे येथील संस्कृती मराठी मंडळातर्फे ऑनलाइन पाककला स्पर्धा घेण्यात आली. पुण्याचे परीक्षक असलेल्या या स्पर्धेत आमच्या सदरलेखिका सौ. अचला सुभाष देसाई यांनी साबुदाणा चाट सादर करून परीक्षकांतर्फे पहिल्या क्रमांकाचे प्रशस्तिपत्र प्राप्त केले.

✶ डॉ. अमित चंद्रशेखर धैर्यवान यांना पेडियाट्रिक आर्थोपिडीक सर्जरीसाठी फेलोशिप मिळाली.

✶ वॉशिंग्टन येथील ॲमेझॉन कंपनीत कॉम्प्युटर इंजिनियर म्हणूनश्री. प्रतिक प्रकाश विजयकर यांची नेमणूक झाली.

✶ सौ. नीलिमा आणि श्री. सुजन राणे यांची धाकटी कन्या डॉ. जान्हवी राणे यांना 'अमेरिकाज बेस्ट डेंटिस्ट' असा किताब मिळाला. जान्हवीने यापूर्वी




न्यूयॉर्क विद्यापीठ आणि हार्वर्ड विद्यापीठातून असे सन्मान प्राप्त केले आहेत.

सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन.

## सांत्वन

आमच्या लेखिका कल्पना सुभाष कोठारे यांच्या यजमानांचे २९ जून, २०२० रोजी दु:खद निधन झाले. कल्पना आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या दु:खात प्रभुतरुण परिवार सहसंवेदन राखून सहभागी आहे.

-संपादक

## परीक्षेतील सुयश

**एफ.वाय.बी.ए.**
**(इंटरनॅशनल हॉस्पिटॅलिटी ॲंड टूरिझम मॅनेजमेंट, यु.के.)**
श्री. राज सूर्यसेन देसाई ७३.७४ %

## पत्रप्रतिक्रिया

जूनचा अंक चांगला निघाला आहे. संपादकीयाविषयी मी लिहिणे म्हणजे एका काजव्याने सूर्याचे वर्णन करण्यासारखे आहे. बन्सी धुरंधर आणि रसिक विजयकर यांचे लेख या बंदिवासाच्या काळात जुन्या आठवणी जागवून दिलासा देऊन गेले.

-वृंदा जयकर

(पान ३ कॉलम ४ वरून)

लाच स्वीकारतो. कळत नकळत वाईट सौदेबाजी करतो. उद्देश इतकाच की, त्याजोगे भरपूर संपत्ती, स्थावरजंगम मिळवून माझ्या सात पिढ्यांचे मी कल्याण करेन. पण नाही. बऱ्याचदा अशा प्रकारच्या सौदेबाजांच्या पुढच्या पिढ्यांना अनेक प्रकारचे त्रास होतात. काहींची अपत्ये अकाली निवर्ततात. तर काहींच्या पुढील पिढ्यांमध्ये शारीरिक व्यंगेही आढळतात. तर काहींची पुढील पिढी दारू, बायका, जुगार इत्यादी व्यसनात गुरफटलेली दिसते. आणि या पापांचा धडा गिरवताना त्या सौदेबाजाचे वार्धक्य पूर्णपणे चिंतेत जाते. त्याचे हे वलय पूर्ण फिके पडते.

याउलट जी माणसे आपली नियतकर्मे सोज्ज्वळपणे निभावतात, देवाचा उचित सन्मान ठेवून वडीलधाऱ्यांना योग्य मान देतात, आपल्या कुटुंबावर निर्व्याज प्रेम करतात, आप्तस्वकीय मित्रांना सोबत घेऊन जीवनातला प्रत्येक प्रसंग आनंददायी करण्याचा प्रयत्न करतात ती माणसे वयाने जरी थकली असली तरी त्यांच्या मस्तकाभोवती हे वलय चक्राकार फिरते आणि ही माणसे जरी रंगाने काळीसावळी असली तरी त्यांच्या मित्रपरिवार, कुटुंब, आप्तस्वकीय यांच्या नजरेत ती आदरणीय ठरतात. या माणसांच्या जाण्याचे स्मरण या आप्तजनांच्या मनात वर्षोनुवर्षे कायम राहते.

तर मंडळी, हा विषय थोडा किचकट वाटला वा वरवर थोडा जटील वाटला तरी आपण यावर शांतपणे विचार केला आणि आपल्या सत्कर्माचा अंगिकार केला तर हे वलय आपल्याभोवती निश्चितच प्रकाशमान होईल इतकेच सांगावेसे वाटते.

(मोबाईल: ९८२१६०७५९३)

✳

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह ॲंड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67